

# सांगाति

श्री संत बाबा महाराज आर्वीकर यांच्या साधनेवरील विचारांचा परामर्ष आम्ही मधून मधून ''दिव्य जीवनाकडे'' या लेखमालेत घेत आला असून पुढील लेखांतही त्यांच्या मौलिक शिकवणुकीचा वेध घेणार आहोत.

बाबा महाराज आर्वीकर यांनी ''सांगाति'' या संतधर्माला वाहिलेल्या वार्षिकाचा शुभारंभ २२ वर्षापूर्वी केला व या वार्षिकाद्वारे ज्ञानोबा-तुकोबांचा, कबीर-नानकांचा संतधर्म बाबा महाराजांनी साधकांच्या हितासाठी सांगितला. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात त्यांनी ''दिव्यामृतधारा'' हा दिव्य ग्रंथ लिहिला. साधकांसाठी गुरुकृपांकित ''साधनासंहिता'' सांगितली. प्रत्यक्ष साक्षात्कार व हळूवार लेखनशैली यांचा संगम साधनासंहितेतून प्रगट होत आला आहे. बाबांचे निर्वाण १९७१ मध्ये झाल्यानंतर त्यांच्या मित्रमंडळाने (ते कुणाला शिष्य मानत नव्हते, की स्वतःला गुरु समजत नव्हते!) किंवा अधिक समर्पक शब्दात मांडायचे म्हणजे भावंडांनी त्यांचे साहित्यव्रत अखंड चालू ठेवले.

या वर्षीचे ''सांगाति'' वार्षिक ''भारतीय जीवना''ला वाहिले असून त्यांत ज्ञानेश्वरी, आध्यात्मिक जीवन, साक्षात्कार, संस्कृती, गुरुकल्पना, सनातन धर्म, स्त्री जीवन, इत्यादींवर मान्यवर प्राध्यापक, पंडित व अभ्यासकांचे लेख समाविष्ट केलेले आहेत. डॉ. अ. स. जोशी, डॉ. व. दि. कुलकर्णी, वा. द. वैशंपायन, डॉ. हेवाळकर, डॉ. अशोक कामत, प्रा. कवीश्वर, डॉ. मधुकर अष्टीकर, प्रा. प्रज्ञा जावडेकर यांची श्रेयनामावली आहे. कवी चकोर आजगांवकर, डॉ. चंद्रकांत भारद्वाज, विश्वनाथ जोशी यांच्या कविताही आहेत. अंकाचे स्वरुप अभ्यासू व ज्ञानी वाचकांना विचारसूत्रे सुचविणारे आहे. बाबा महाराजांची प्रवचने प्रत्यक्ष साधना व जीवन याबद्दल प्रत्यक्ष मार्गदर्शनपर असल्याने अमोल आहेत. सामान्य वाचक व अभ्यासक या दोघांसाठी सुस्पष्ट सोप्या शब्दात संतसाहित्य व संतधर्माचा गाभा मांडण्याचा प्रयत्न विद्वान लेखकांनी केल्यास अंकाचा अधिक प्रसार होवू शकेल व विचारधनाचा ठसा मनावर चिरकाल उमटू शकेल. केवळ भारदस्त शब्द हे सुस्पष्ट अर्थ व अनुभवावाचून सुगम विवेचनाशिवाय मनात ठसू शकत नाहीत वा निश्चित मार्गदर्शन करू शकत नाहीत, हे अध्यात्मपर लिखाण करताना लेखकांनी ध्यानात ठेवल्यास हितकारक ठरेल.

–सांगाति (वार्षिक अंक)
संपादक–श्री. शरद भगत
प्रकाशन स्थळ: मोक्षधाम, माचणूर, ता- मंगळवेढा, जिल्हा- सोलापूर.
मूल्य: रु. १५/-

# भक्ती

- सौ. शशीकला सोनावणे
कुर्ला (पूर्व), मुंबई.

भगवंतावर विश्वास ठेवा म्हणजे नेमके काय करा ? तर, भगवंताच्या सामर्थ्यावर दुर्दम्य बौद्धिक श्रद्धा निर्माण झाली पाहिजे. काल्पनिक श्रद्धा किंवा मानलेली श्रद्धा उपयोगी नाही. कुणाचे अनुकरण देखील असू नये. स्वत:च्या मनात आदराने श्रद्धा निर्माण झाली पाहिजे आणि त्यासाठी सतत प्रयत्नही केले पाहिजेत. मनावर सतत हातोड्याच्या प्रहारासारखे विचारांचे प्रहार होत राहिले पाहिजेत. भगवंताच्या सामर्थ्यावर आणि भगवंताच्या आत्मियतेवर विश्वास निर्माण झाला, तर भगवंतावर प्रेम बसते. केलेल्या कार्याची जबाबदारी आपण जेव्हा श्रीकृष्णार्पण करून मोकळे होतो, तेव्हाच भगवंत खरीखुरी जबाबदारी उचलतो. ज्या मनाला ईश्वराचा स्पर्श झाला आहे, त्याला शुभमन म्हणतात. आपल्या मनाला ईश्वराचा स्पर्श व्हावा म्हणून प्रयत्न करणे, हाच मुमुक्ष बनण्याचा मार्ग आहे. हाच भगवंताजवळ जाण्याचा मुख्य मार्ग आहे. मला निर्माण करण्यात व जगविण्यात त्याचा निश्चित काही हेतू आहे, हे जो जाणतो, त्या माणसाच्या वर्तमानात बदल घडून येतो. तो त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करतो व जास्तीत-जास्त भगवंताच्याजवळ जाण्याचा प्रयत्न करतो. जी प्रेमवृत्ती रूपरहित आहे आणि जी जीवनवृत्ती दु:खरहित आहे, ती वृत्ती जो माणूस जीवनामध्ये वाढवतो, संभाळतो, तो भगवंताला प्राप्त करू शकतो. जीवनात विकास साधून ईश्वर प्राप्त करावयाचा असेल, तर प्रेमवृत्ती विकसित केली पाहिजे ; कारण भगवान अरूप आहे. आपणा सर्वांच्या अंत:करणात त्याचा वास आहे. मानवदेह सार्थ करण्यासाठी आपण जास्तीत-जास्त ईश्वराच्या जवळ कसे जाऊ, हा विचार करून आपले दोष हे स्वत:च्या विचाराने सतत मनावर प्रहार करून त्यात बदल करण्याचा प्रयत्न केला पाहिजे व जसा मनी भाव, तसा अनुभव आपल्याला दयाघन दाखवून देईल, यात शंका नाही.

मनाला ताजे ठेवा, स्वच्छ ठेवा आणि इंद्रियांना विषयापासून परावृत्त करा, याचेच नाव भक्ती आहे.

# बाबांचे दोन पैसे

- श्री. जनार्दन बांदेकर
मुंबई.

साईबाबा आपल्या भक्तांना सांगत, तुम्ही माझ्याकडे पहा, म्हणजे मी तुमच्याकडे पाहीन! परमेश्वराचे सतत नामस्मरण केल्याने भक्तांची दु:खे दूर होतात. बाबांना ओळखायला भक्तांना वेळ लागतो, परंतु भक्तांची मने ओळखायला बाबांना क्षणाचाही अवधी लागत नाही. ह्या संदर्भात बाबांचा एक लाडका भक्त काशिराम शिंपी याचे उदाहरण घेता येईल.

साईबाबांचे कपडे साधेच असायचे. सैल पायजमा, कुडता आणि डोक्याला रूमाल. हे कपडे काशिराम शिवून देत असे. कालांतराने काशिरामच्या मनात बाबांना दक्षिणा देण्याचा विचार आला. त्याप्रमाणे एके दिवशी कपड्यांच्या शिलाईच्या पैशातून काही रक्कम बाबांना देण्यासाठी त्याने पुढे केली असता, बाबांनी काशिरामला साफ नकार दिला; परंतु काशिरामच्या अति आग्रहामुळे बाबांनी दक्षिणा घेतली, ती केवळ काशिरामचे मन दुखावू नये म्हणून. ह्या गोष्टीने मात्र काशिरामला गर्व झाला. काशिराम इतर भक्तांना सांगत सुटला, तुम्हा कुणाकडूनही बाबा दक्षिणा घेत नाहीत, परंतु माझ्या जवळून घेतात की नाही! भक्तांकडून जो पैसा मिळे, त्यातून बाबा दिनदुबळ्यांना दान-धर्म, धुनीसाठी रोज लागणारे सर्पण, आणि चिलिम ओढण्यासाठी लागणारा तंबाखू इत्यादिंसाठीच खर्च करीत. काशिरामच्या मनातील अहंकार नाहीसा करण्यासाठी बाबांनी एक मार्ग अवलंबिला. बाबांनी काशिरामजवळ दररोज दक्षिणा मागण्याचा मुद्दाम सपाटाच लावला. मनुष्याजवळ कितीही अलोट संपत्ती, धनदौलत, दागदागिना असला, तरी ईश्वर चरणी तो पुरा पडेल का!

पहिले काही महिने, दिवस काशिराम बाबांना दक्षिणा देत होता. पुढे-पुढे काशिरामची ओढाताण होऊ लागली. बाबा काशिरामला एकदा जाणूनबुजून म्हणाले, अजून मला दक्षिणा मिळाली नाही. मला दक्षिणा हवी. त्यावर अश्रू भरल्या डोळ्यांनी व केविलवाण्या तोंडाने काशिराम बाबांना म्हणाला, बाबा, माझ्याजवळ दक्षिणा द्यायला आज काही शिल्लक नाही. त्यावर बाबा म्हणाले, काय वाट्टेल ते कर! वाण्याकडून उधारी घे, नाहीतर आणि काही; परंतु मला दक्षिणा दे! बाबा, आजपर्यंत मी फार उधारी केलेली आहे. मोठा कर्जबाजारी होऊन बसलो आहे. मला आता कुणीही उभा करणार नाही. मी काय करू? असे म्हणत काशिराम लहान मुलासारखा बाबांच्या पायांवर डोके ठेवून अश्रू ढाळू लागला. त्याला फार दु:ख झाले. त्या दु:खाने

तो व्यथित झाला. तोंडातून मुळी शब्दच बाहेर पडेनात. बाबांना तोंड दाखविण्याचेही काशिरामला भय वाटू लागले.

बाबा मी चुकलो, मला क्षमा करा, असे आर्त स्वरात म्हणत काशिराम बाबांच्या चरणावर पडून राहिला. काशिराम, चल उठ! वेडा कुठला! अरे दक्षिणा देऊन का कधी कुणी मोठा होतो! प्रत्येकाने आपल्या परिस्थितीनुसार वागावे. या ठिकाणी बाबांना काशिरामला तर उपदेश दयायचा आहेच, परंतु आपल्या सर्व भक्तांनासुद्धा ह्या प्रसंगाद्वारे मार्गदर्शन करावयाचे आहे.

बाबा काशिरामला उठवित म्हणाले, चल, जा. कामाला लाग. काशिराम शरमिंदा होऊन खाली मान घालून निघून गेला आणि कपडे शिवण्याच्या आपल्या धंद्यामध्ये रमून गेला. काशिरामच्या मनातील खरी भक्ती बाबांनी जाणली होती. साईबाबांच्या आशीर्वादामुळे काशिरामची कमाई वाढली आणि होती ती परिस्थिती पूर्ववत झाली व तो सुखासमाधानात राहू लागला.

साईबाबांची नित्यनेमाने सेवा करावी, सर्पणासाठी स्वत: डोक्यावरून मोठमोठी लाकडे वाहून आणावी, बाबांना वेळोवेळी चिलिम तयार करून प्रथम स्वत: दोन-चार झुरके मारून मग ती चिलिम बाबांना द्यावी आणि इतर अनेक बारीक-सारीक कामे रोजच्या रोज काशिराम करीत असे. काशिराम साईबाबांचा एकनिष्ठ सेवक असल्यामुळे सगळीकडे काशिरामला साई ...साईच दिसत.

साईबाबांच्या प्रत्येक भक्ताने श्रद्धेने आणि सबुरीने बाबांची सेवा केल्यास, बाबांचा वरदहस्त सदैव त्याच्या मस्तकावर राहून ह्या मोहरूपी जीवनात ईश्वराची सेवा केल्याचे समाधान त्याला मिळेल.

---

**तू माझा आणि मीहि तुझा हे नाते**
**जाणून आचरी अपुल्या कर्तव्याते**
**घे शस्त्र करी, हो सज्ज अता समराला**
**रणकर्म शोभते तुझ्या क्षात्रधर्माला**

**चरणावर माझ्या अर्प कर्मफळ सारे**
**घे वचन, उद्धरिन अंती तुज पार्था रे!**
**मग उठला अर्जुन घेऊन शस्त्र करात**
**ओसरे मोह, घे उडी धर्मयुद्धात**

**- गीता**

---



# ही तर माझ्या साईंची कृपा

अगदी लहानपणापासून मी साईबाबांची भक्त असून, साईनाथांनी मला छोट्या-मोठ्या संकटांतून कित्येकदा वाचविले आहे. असाच हा माझ्या आयुष्यातील महत्वाचा प्रसंग! मुंबईहून मी न्यूयॉर्कला (अमेरिका) विमानाने प्रवास करीत होते; थोडा बहुत प्रवास झाला असेल नसेल, तोच माझी प्रकृती बिघडली. विमानात मी विशेष काहीच खाल्ले नाही. जागा रिकामी मिळाल्याने निवांत पडून राहिले. सहा तासानंतर न्यूयॉर्क शहर आले; मी कशीबशी सामानाची आवराआवर केली व बाहेर आले. विमानतळावर माझी धाकटी नणंद व सासूबाई मला घेण्यासाठी आल्या होत्या. त्या वेळेस माझी नणंद आठ महिन्यांची गरोदर होती. त्यामुळे मी तिला जड सामान उचलण्यास मनाई करु लागले व स्वत:च सामानाची आवराआवर करु लागले. ह्या अवधीत मी माझी हातातील पर्स सहज बाजूला म्हणून बेंचवर ठेवली व ऐनवेळेस ती पर्सच घ्यायला विसरून गेले. जवळजवळ घरापर्यंत आलो (सुमारे साठ मैल), तेव्हा कुठे लक्षात आलं की, अरे, मी माझी पर्स रस्त्यात सामान ठेवताना विसरले. झालं! माझ्या काळजाचं पाणी पाणी झालं; कारण त्या पर्समध्ये माझा पासपोर्ट, ग्रीनकार्ड (जे अमेरिकेत अेकदां का हरवलं, तर पुन्हा मिळणं अत्यंत कठीण!), थोडीशी ज्वेलरी, माझ्या साईनाथांचं "श्री साईलीला" मासिक आणि बाबांचे शिर्डीत विकत घेतलेले काही फोटोज् इतक्या वस्तू होत्या. आम्ही रात्री दहा वाजता घरी आलो, त्यामुळे चौकशी करू शकलो नाही. दुसऱ्या दिवशी पुन्हा साठ मैल लांब न्यूयॉर्क विमानतळावर जाऊन सर्वत्र चौकशी केली; पण निराशेपलीकडे हाती काही सापडलं नाही. माझं मन मात्र मला सांगत होतं की, बाबा मला निराश करणार नाहीत ;कारण फोटोच्या रुपात ते माझ्या पर्सची काळजी घेत असतील आणि काय आश्चर्य! आता शेवटचा उपाय म्हणून एका ऑफिसात दारातून आत जाणार, इतक्यात समोरच इतरांच्या सामानाबरोबर ठेवलेली माझी पर्स मला दिसली. कित्ती कित्ती आनंद झाला म्हणून सांगू! बाबांची आठवण येऊन मी तर अगदी गहींवरलेच. मी साईबाबांना शतश: प्रणाम केले; आणि कळत-नकळत माझ्या मुखातून, धन्यवाद बाबा! हे उद्‌गार बाहेर पडले.

अमेरिकेत असलो तरी आम्ही दर गुरुवारी सहकुटुंब साईबाबांची यथाविधी पूजा-अर्चा, आरती करतो.

**- सौ. सुमन विश्वबंधु पतंगे**
फ्लॉरिडा, अमेरिका.

**श्री साईबाबांच्या शुभाशीर्वादासह**

# ‘‘श्री साईलीला’’ - मानवतावादी तत्त्वज्ञान

‘‘बाबांच्या प्रेमाची पहिली ज्योत’’ हा लेख वाचला व धन्य झालो. श्री साईबाबा म्हणजे केवळ चमत्कार नव्हेत, तर त्यांचे मानवतावादी तत्त्वज्ञान म्हणजेच साईबाबा हे आपण लिहिलेले मला पटले. रामनवमी अंकातील ‘‘साईरामाचे अध्यात्म रामायण’’ वाचून मनाला अत्यंत समाधान वाटले, नवा अर्थ, प्रकाश सापडला.

**- प्रा. सुनील देसाई**
गडहिंग्लज, कोल्हापूर.

‘‘श्री साईलीले’’त प्रसिद्ध झालेले लेख वाचल्यावर एकप्रकारची अनुभूती व भावनिर्भरता देहाला स्पर्श करून जाते. कधी कधी असा भास होतो की, वरील प्रकारच्या भावनांशी माझे पूर्वापार जन्मीचे काही नाते तर नसेल ना!

**- शं. ल. अवधूत**
जगदलपूर, म.प्र.

‘‘ऐसी कळवळ्याची जात’’ म्हणूनच हा आनंदाचा, प्रेमाचा वर्षाव झाला आणि श्री. चकोर आजगांवकर यांचा लेख नाथषष्ठी उत्सवात वाचला गेला.

**- सहकारमहर्षी शं. ना. लाठोरे**
भिवंडी, ठाणे.

‘‘श्री साईलीले’’चे उत्तम संपादन करण्याबद्दल संपादकीय विभागाला धन्यवाद.

**- एम्. के. पाटील**
चेअरमन, बेलगंगा साखर कारखाना,
चाळीसगांव.

श्री. चकोर आजगांवकर यांचे मे व जून मधील ‘‘श्री साईलीले’’तील अध्यात्म परिपूर्ण लेख वाचले व मंत्रमुग्ध झाले. खरं तर त्यांचे वर्णन करण्यास शब्दच नाहीत.

**- सौ. नीता जाधव**
महाड.

–"श्री साईलीला" मासिकाचा ऑक्टोबर १९८९चा अंक खूपच वाचनीय आहे. विशेषत: बाबांचे मुखपृष्ठावरील चित्र मन प्रसन्न करणारे आहे. यापुढेही आपण अशीच बाबांची बोलकी चित्रे प्रसिद्ध करुन आम्हा साईभक्तांना एका अवर्णनीय आनंदाचा लाभ घेण्याची संधी उपलब्ध करून द्याल, अशी आशा आहे. खरं म्हणजे आम्ही ऑगस्ट १९८९ पासून ह्या मासिकाचे वर्गणीदार झालो आहोत; पण या दोन-तीन महिन्यांत "श्री साईलीले"शी आमचे इतके नाते जडले आहे की, हे मासिक यायला दोन दिवस जरी ऊशीर झाला, तर मन कसे अगदी बेचैन होऊन जाते.

**- कु. वर्षा म. मोहिले**
मुंबई सेंट्रल, मुंबई.

–ऑक्टोबर १९८९चा "श्री साईलीला" अंक वाचला. फारच आवडला. प्रस्तुत अंकात "श्री साईबाबांची उपदेशाची तऱ्हा" हा लेख खूपच प्रबोधन करणारा आहे. खरोखरच धन्य ते साईभक्त की, ज्यांना बाबांच्या मूखातून उपदेशरुपी अमृतवाणी ऐकावयास मिळाली. आम्हालासुद्धा श्री बाबांच्या कृपेने आपल्या "श्री साईलीला" मासिका मार्फत प्रत्येक अंकाच्यावेळी निरनिराळ्या पद्धतीने बाबांचा उपदेश ऐकावयास मिळतो, यातच आम्ही स्वत:ला धन्य समजतो. याबद्दल संपादकीय विभागाचे आम्ही आभारी आहोत.

**- सौ. माधवी मोहन ढगे**
वसई, ठाणे.

–"श्री साईलीला" मासिक वाचल्याने खूपच आधार वाटतो. ह्या मासिकाचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.

**- श्री. शाम पुंडलिक एलिंजे**
अंधेरी, मुंबई.

–आपला प्रत्येक अंक उत्कृष्ट व भरपूर माहितीप्रचूर असतो. याबद्दल हार्दीक अभिनंदन. तसेच अंकाची मांडणी व मुखपृष्ठ आकर्षक असते.

**- श्री. बी. व्ही. अवसरे**
तासगांव, सांगली.

–"श्री साईलीला" च्या जानेवारी अंक वाचला. खूपच आवडला. गद्य, पद्य व अन्य लेखन खूपच प्रभावित करणारे आहे.

**- श्री. सुनील अुत्रीवाले**
शिवाजी नगर, भोपाळ.

"श्री साईलीले"चा जानेवारी अंक मिळाला. तो वाचून मला अत्यानंद झाला. आपण "श्री साईलीला" मासिकाचा दर्जा खूपच उंचाविला आहे. साहित्यिक मूल्ये कटाक्षाने जपल्याने विविधांगी सदरे साईभक्तांना मोहून टाकतात. विशेषत: ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त) यांनी आपल्या खास, सुंदर शैलीत वर्णिलेला श्री साई सत्‌चरिताचा स्वैर (गद्य) अनुवाद साऱ्या साईभाविकांना मानसिक आनंद, समाधान देतो. गीतेतील सुंदर वचने आध्यात्मिक प्रबोधन करतात.

**- श्री. चंद्रकांत नाचणे**
विलेपार्ले (पूर्व), मुंबई.

"श्री साईलीला" मासिकाचा दर्जा निश्चितपणे वाढला आहे. साधनेसारख्या अत्यंत महत्वपूर्ण विषयांवर सुरेख लेखन प्रसिद्ध होत आहे. जे छापले जात आहे, ते खरोखरच वाचनीय आहे.

**- श्री. अनिल रसाळ**
वडाळा, मुंबई.

"श्री साईलीला" अंकात खूपच सुधारणा झाल्या आहेत, यात शंकाच नाही. अनुभवांना वाव मिळेल, अशी अपेक्षा.

**- श्री. वा. भ. वैद्य**
गोरेगाव, मुंबई

# घोषणा

श्री साईलीला मासिकाच्या मालकीबद्दल व अन्य तपशीलाबद्दल दरवर्षी फेब्रुवारी नंतरच्या पहिल्या अंकात प्रसिद्ध करावयाची घोषणा.

| | | |
|---|---|---|
| १. | प्रकाशनाचे स्थळ | – साईनिकेतन,<br>८०४ बी, डॉ. आंबेडकर मार्ग,<br>दादर, मुंबई-४०० ०१४. |
| २. | प्रकाशनाचा कालावधी | – मासिक |
| ३. | मुद्रकाचे नाव | – श्री. एम. डी. राजन |
| | राष्ट्रीयत्व | – भारतीय |
| | पत्ता | – गीता ऑफसेट, बी-२३,<br>रॉयल इंडस्ट्रियल इस्टेट,<br>नायगाव क्रॉस रोड, वडाळा,<br>मुंबई-४०० ०३१. |
| ४. | प्रकाशकाचे नाव | – श्री. के. पं. क्षीरसागर |
| | राष्ट्रीयत्व | – भारतीय |
| | पत्ता | – साईनिकेतन,<br>८०४ बी, डॉ. आंबेडकर मार्ग,<br>दादर, मुंबई-४०० ०१४. |
| ५. | संपादकाचे नाव | – श्री. के. पं. क्षीरसागर |
| | राष्ट्रीयत्व | – भारतीय |
| ६. | हे पत्र ज्यांच्या मालकीचे आहे, त्यांचे व १ टक्क्याहून अधिक भांडवल धारण करणारे भागधारक किंवा भागदार यांची नावे व पत्ते | – श्री साईबाबा संस्थान, शिरडी<br>(धार्मिक व चॅरिटेबल संस्था) |

मी, श्री. के. पं. क्षीरसागर यानुसार असे घोषित करतो की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे सत्य आहे.

श्री. के. पं. क्षीरसागर
(प्रकाशकाची सही)
कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान, शिरडी

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
## श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ३१-०० | ९-०० |
| २. | –"– | इंग्रजी | १२-५० | ६-५० |
| ३. | –"– | हिंदी | १६-७५ | – |
| ४. | –"– | गुजराथी | १९-०० | ६-५० |
| ५. | –"– | कन्नड | १३-५० | ८-०० |
| ६. | –"– | तेलगु | १९-०० | ८-०० |
| ७. | –"– | तामीळ | – | – |
| ८. | –"– | सिंधी | २२-०० | ७-५० |
| ९. | श्री साईसत्चरित पोथी | गुजराथी | ३१-०० | १०-५० |
| १०. | श्री साई लिलामृत | मराठी | ९-०० | – |
| ११. | –"– | हिंदी | ११-०० | – |
| १२. | –"– | गुजराथी | ६-६५ | ४-०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ४-२५ | – |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | ०-६५ | ३-५० |
| १५. | –"– | हिंदी | १-१५ | ३-५० |
| १६. | –"– | गुजराथी | ०–९० | ३-५० |
| १७. | सगुणोपासना (आरती) | मराठी | ०-७० | ३-५० |
| १८. | –"– | हिंदी | १-२५ | ३-५० |
| १९. | –"– | गुजराथी | ०-९५ | ३-५० |
| २०. | –"– | तेलगु | ३-५० | ५-५० |
| २१. | –"– | सिंधी | १-२५ | ३-५० |
| २२. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | १-८५ | ३-५० |
| २३. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ६-८० | ५-५० |
| २४. | मुलांचे साईबाबा | मराठी | १-५० | – |
| २५. | –"– | इंग्रजी | १-८५ | – |
| २६. | –"– | हिंदी | १-५० | – |
| २७. | –"– | गुजराथी | १-६५ | ३-५० |
| २८. | –"– | तेलगु | २-०० | – |
| २९. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १-१५ | ३-५० |
| ३०. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ६-०० | ४-०० |
| ३१. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ४-५० | ४-०० |
| ३२. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३-५० | ४-०० |
| ३३. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५-२५ | ४-५० |
| ३४. | स्तवनमंजरी | इंग्रजी | १-१० | ३-५० |
| ३५. | शिरडी डायरी (खापर्डे) | इंग्रजी | ९-५० | ४-५० |

Licence to Post Without Prepaym
at Dadar Head Office, Bombay-
Regd.: No. MH/BYE/
LICENCE No.

# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## फोटोंची यादी

| अनु. क. | फोटोचे नांव | साईज | किंमत | पोस्टेज व पॅकिंग |
|---|---|---|---|---|
| १ | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | १४" x २०" | १.७५ | ५.५० |
| २. | –"– | पोष्टकार्ड | ०-२५ | "–" |
| ३. | –"– | २" x ३" | ०-१० | –"– |
| ४. | द्वारकामाई (४ रंगात) | १७" x २२" | २-८० | –"– |
| ५. | –" | १४" x २०" | १-७५ | –"– |
| ६. | –" | १०" x १४" | १-१५ | –"– |
| ७. | मूर्ती (४ रंगात) | १४" x २०" | १-७५ | –"– |
| ८. | –"– | १०" x १४" | १-१५ | –"– |
| ९. | –"– | ७" x १४" | ०-६० | –"– |
| १०. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १४" x २०" | १-७५ | –"– |
| ११. | –"– | १०" x १८" | १-१५ | –"– |
| १२. | –"– | ७" x १०" | ०-६० | –"– |
| १३. | चेहरा फोटो (४ रंगात) | पोष्टकार्ड | ०-२५ | –"– |
| १४. | पालखी (४ रंगात) | पोष्टकार्ड | ०-२५ | –"– |
| १४. | पालखी (४ रंगात) | ७" x १०" | ०-६० | –"– |
| १५. | दगडावर बसलेले बाबा (काळा/पांढरा) | १४" x २०" | १-४० | –"– |

**पुस्तकं आणि छायाचित्रे मिळण्याचे ठिकाण :—**

१. कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिरडी
पो. शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर - ४२३ १०९.

२. साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई - ४०० ०१४.


मुद्रक : श्री. एम. डी. राजन, गीता ऑफसेट, बी-२३, रॉयल इंडस्ट्रियल इस्टेट, नायगांव क्रॉस रोड, वडाळा, मुंबई - ४०० ०३१.

**संपादक व प्रकाशक :** कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिरडी, साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४.

एप्रिल १९९०)   (किंमत २ रु.

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



एप्रिल १९९०

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत मासिक

संपादक
कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिरडी

श्री रामनवमी विशेषांक


वर्ष ६९ वे) किंमत २ रुपये (अंक १ ला
दूरध्वनी ४१२२५६१



-: कार्यालय :-

पोस्ट-शिरडी-४२३१०९, जिल्हा-अहमदनगर.
साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई-४०० ०१४.



वार्षिक वर्गणी रु. १०/-

(ट.ख.सह)

तहहयात वर्गणी - ३०० रु.

इतर देशांकरिता ट.ख.सह वार्षिक वर्गणी रु. ११५/-

**श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे
हे श्री साईलीला मासिकाचे मुख्य उद्दिष्ट आहे.**



# रघुनाथ सावित्री साईनाथ भजनमाला

१०४

न सोडी मी आशा श्रीगुरुकृपेची। पहाट होण्याची वेळ आली॥
लागल्या तहान जीव शुष्क होतो। मुखें ओरडतो पाणी पाणी॥
श्रीमंत धन्याचे धरिले मी पाय। फुकट न जाय कदाकाळीं॥
दिला अवकाश तयानें दासाला। दृढ करायला भाव मनीं॥

१०५

बरें रामनाम बरें कृष्णनाम। बरें गुरुनाम घ्यावयातें॥
वरा तो मानव घेई मुखीं नाम। निज सौख्यधाम मिळे तया॥
करी क्लेशमुक्त हरी दुःख शोक। ऐसें तें तारक जडजीवां॥
श्रीसंतपदाला करीं नमस्कार। कृपेनें संस्कार झाला मनीं॥

१०६

भक्तजन घेती नाम रे अनंता। चाले जगीं सत्ता सर्वांवरी॥
आमुचा मालक जगाचा चालक। विश्वाचा पालक तूंचि एक॥
नेमियेलें कार्य चाले तुझे सत्ते। पंचमहाभूतें पहा कैसीं॥
जळी स्थळी काष्ठीं पुरा भरलासी। ऐसें ये मनासीं वाटतसे॥
दास म्हणे देवा तूं सर्वाधिकारी। मी काय भिकारी बोलूं शकें॥

**या मासिकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.**

# रसने राम नाम रस प्यावा



'रसने, राम नाम रस प्यावा' असे कबीर आपल्या रसवंतीला सांगतात. मूळ ॐकाराचे शक्तिसंपुटित सामर्थ्य 'राम' नामाच्या 'र'कारात आहे. हे सौंदर्य, हे सामर्थ्य व हे सत्य कबीरांनी जाणले व ही सुधा इतरांना वाटली.

रसने राम नाम रस प्यावा!
गुणातीत तो गोड सुधारस क्षणक्षण प्राशावा।।धृ।।

राम नाम ते निर्गुण देईल शुद्ध बुद्धीचा ठेवा।।१।।
लोभ मोह मद दंभ नसावा, भोग दूर ठेवावा।।२।।
कधि न बुडावे व्यर्थ विवादी, नामि भाव विरवावा।।३।।
राम नाम हे नित्य जपावे, जन्मच उद्धारावा।।४।।
कबीर सांगे नामि रमावे, बुडवावे तनुभावा।।५।।

**- कबीर वाणी**

श्री रामनवमी, ३/४/१९९०

---

# रामभक्त - श्री हनुमान



श्री हनुमान हे सेवेचे, निष्ठेचे, समर्पणाचे आणि शक्तीचे दैवत आहे. संपूर्ण राममय, रामनिष्ठ, रामपरायण आणि रामकार्यसमर्पित अशी हनुमंताची स्वामिनिष्ठा व सेवाव्रत आहे यामुळे हनुमंत चिरंजीव बनले आहेत. हनुमंतामागे प्रचंड रुद्रशक्ति उभी आहे. ही शक्ति सात्विकता, नीति, ब्रह्मचर्य व सदाचार यांच्या रक्षणासाठी अवतरली आहे. हनुमान ही आत्मारामाची कार्यशक्ति आहे. हनुमंताची रुद्रशक्ती समाजकारण, राजकारण इतकेच नव्हे तर ग्रामकारणातहि आणि व्यक्तिजीवनात आवश्यक आहे. यासाठी संत रामदासांना गावोगावी मारुतीरायाची स्थापना केली. राष्ट्रीय बाणा व बलाची उपासना यांचे ध्येय अंतरी बाळगणाऱ्यांनी हनुमाला आपले कुलदैवत मानले आहे. श्री साईबाबांच्या मनात हनुमानाबद्दल अत्यंत थोर प्रेमादर होता. शनिपारावरील हनुमंताकडे बोट दाखवून ते म्हणत, "हे माझे आईबाप!" हनुमानाच्या पायाखाली दोन पावले दूरच ते विनयाने वसत. पाथरीच्या त्यांच्या कथित कुटुंबाचे हनुमान हे कुलदैवत होते, असे संशोधक सांगतात. बाबा शक्तीस्वरूप होते. हा अकरावा रुद्र जणु रामरुप जनताजनार्दनाच्या सेवेस अवतरला होता.

हनुमान जयंती, १०/४/१९९०

# श्री शंकराचार्य



बाळाचे पाय पाळण्यात दिसतात म्हणतात, त्याप्रमाणे श्री शंकराचार्यांच्या बालपणातील तल्लख हुशारीने ते पुढे कुणीतरी विद्वान होणार, हे तेंव्हाच दाखवून दिलं होतं. त्यांचं बालवयातील नाव होतं शंकर. आठव्या शतकाच्या सुमाराला केरळ राज्यातील कालडी नावाच्या गावी एका ब्राह्मण कुटुंबात जन्मलेल्या तेजस्वी मुलाने, शंकराने लहानपणीच आपल्या बुद्धीची चमक दाखवून सगळ्यांनाच तोंडात बोटं घालायला लावली. विविध धर्मग्रंथांचा संपूर्ण अभ्यास करून त्याने अनेक पंडितांना आश्चर्यचकित केलं. वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षीच त्याने आपलं सर्व शिक्षण पूर्ण केलं आणि तो विद्वान झाला. त्याचं मन इतर मुलांसारखं हसण्या-बागडण्याकडे किंवा सर्वसामान्यांसारखं जगण्याकडे नव्हतं, तर त्यागीवृत्तीचं जीवन जगण्याकडे त्याचा ओढा होता. म्हणून त्याने संन्यास घेण्याचा निश्चय केला. त्याने नर्मदातटावर आत्मज्ञानाचं शिक्षण घेतलं. भगवान् वेदव्यासांच्या वेदान्तसूत्रांवर त्यानं भाष्य लिहिलं. हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत व काश्मीरपासून आसामपर्यंत त्याने पदभ्रमण केलं. ह्या पदयात्रेमध्ये त्याने अनेक पंडितांना, विद्वानांना वादविवादात हरविलं. त्यातील अनेकजण त्याचे अनुयायी झाले. आणि शंकर श्री शंकराचार्य म्हणून ओळखला जाऊ लागला. अद्वैत वेदान्ताचे महत्व व श्रेष्ठत्व श्री शंकराचार्यांनी समाजाला पटवून दिलं. त्यांनी भारताच्या पूर्वेला जगन्नाथपुरीत गोवर्धन मठ, उत्तरला हिमालय बदरिकाश्रमात ज्योतिर्मठ, पश्चिमेला द्वारकेत शारदामठ आणि दक्षिणेला कर्नाटकात शृंगेरीमठ असे चार मठ स्थापन केले. त्यांनी संन्याश्यांच्या गिरी, पुरी, भारती, सरस्वती, तीर्थ, आश्रम, वन, अरण्य, पर्वत व सागर अशा दहा श्रेणी सांगितल्या. ब्रह्मसूत्र, उपनिषदं व भगवद्गीता यांवर त्यांनी भाष्य लिहिले. विवेकचूडामणी तसंच अपरोक्षानुभूति हे त्यांचे ग्रंथ त्यांच्या अमोघ ज्ञानाचं दर्शन घडवितात. ते अद्वैतवादी होते; परंतु त्यांच्याठायी भक्तिभावाचा प्रवाहही वाहत होता. सन ८२० मध्ये वयाच्या ३२व्या वर्षी श्री शंकराचार्य हिमालय पर्वतावर केदारनाथमध्ये महासमाधित विलीन झाले.


**श्री शंकराचार्य जयंती, २९/४/१९९०**

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | संपादकीय | – श्री. चकोर आजगांवकर | ७ |
| २. | भक्तांचा भगवंत साईराम | – श्री. म. ग. अंबाडे | १३ |
| ३. | साईबाबा भक्तांना सांगतात... | – सौ. कु. र. चव्हाण | १६ |
| ४. | नामाची ध्वजा लावील मंदिरी | – श्री. भा. के. गन्द्रे | २० |
| ५. | साई-राम | – | २१ |
| ६. | श्री साईनामाचा महिमा | – श्री. सू. मा. गर्जे | २३ |
| ७. | भजन म्हणा भजन म्हणा | – श्री. ग्या. द. नर्से | २४ |
| ८. | श्री साईंचे सत्य चरित्र, अध्याय ५ वा | – श्री. मु. ब. निंबाळकर | २५ |
| ९. | श्री साईबाबांची भक्ती व त्यांची शिकवण | – श्री. आं. शा. फर्नांडिस | ३० |
| १०. | अद्वैत गुरु-शिष्य योग | – श्री. सतीश चुरी | ३५ |
| ११. | श्री. माधवराव बळवंत (बाबांचा शाम्या) देशपांडे शिरडीकर यांचे अल्प चरित्र | – | ३८ |
| १२. | दिव्य जीवनाकडे | – श्री. चकोर आजगांवकर | ४० |
| १३. | श्री साई महिमा | – कु. सु. धों. होवळे | ४२ |
| १४. | कोण हा टॅक्सी-ड्रायव्हर | – श्री. शं. ग. सारंगधर | ४३ |
| १५. | साई आले | – सौ. प्र. द. पाडगावकर | ४५ |
| १६. | संन्यास | – फकीर | ४६ |
| १७. | ध्यास | – श्री. चंद्रशेखर नकाते | ४७ |
| १८. | तेजोनिधे साईस | – सौ. मृ. ह. पुंडलिक | ४८ |
| १९. | भाग्यवान साईभगिनींनो! | – श्री. चकोर आजगांवकर | ४९ |
| २०. | आळंदीचे 'संत-वस्तु-धाम' | – श्री. सं. श्री. वाघ | ५१ |
| २१. | रामनामाचे लाघव | – वैखरीताई | ५३ |
| २२. | ऐसा हा अवतार विलक्षण | – | ५४ |
| २३. | भक्ताचा आनंद हा बाबांचा आहार | – श्री. शाम जुवळे | ५५ |
| २४. | साई तारी त्याला कोण मारी | – सौ. श. भा. सोनावणे | ५७ |
| २५. | भ्रष्ट समाज त्रस्त भक्त-श्रींची भक्ती एक दिलासा | – श्री. अ. के. रसाळ | ५८ |
| २६. | 'साई'नाम अक्षरे दोन, गुरुकृपेचा समुद्र जाण | – श्री. वि. म. हटवार | ६१ |

# श्री साईरामाचा रामसंदेश


## संपादकीय



गेल्यावर्षी एप्रिलच्या रामनवमी विशेषांकातील 'साईरामाच्या नवविधाभक्तीची चैत्रनवमी' व जूनच्या अंकातील 'कबीराची ज्येष्ठ पौर्णिमा' या दोन अग्रलेखांत श्री साईबाबा व त्यांचे पूर्वावतार संत कबीर यांच्या जीवन व तत्त्वज्ञानाचा परामर्श थोडक्यात पण मार्मिक शब्दात घेतला गेला होता, हे वाचकांना चांगलेच स्मरत असेल.

श्री रामनवमी ही बाबांच्या व कबीरांच्या जीवनात महत्त्वपूर्ण आहे. दोघा महात्म्यांच्या जीवनात रामभक्तीचे सूत्र गुंफलेले आहे. कबीरांनी वैष्णव रामभक्तीला निर्गुण रामनामाच्या साधनेची जोड दिली, तर साईबाबांनी नाथपंथी सोऽहं साधनेला अजपाजपी रामनामाची, गुरुध्यानाची, सगुण उपासनेची किनार दिली. दोघेही राम, साई, अल्ला यांचे दास होते. कर्मठपणाचा दोघांनाही तिटकारा होता. त्यांचा देव मशिद, मंदिरात नव्हता. तो विश्वाला व्यापून श्वासोश्वासातही भरला होता. तो प्रेमात, भक्तीत, समर्पणात तसा मानवतेत व सेवाधर्मात होता.

या रामनवमीस आपण बाह्यदर्शनाकडून बाबांच्या व कबीरांच्या आंतरदर्शनाकडे वळू या. ते पहा समाधिमंदिर! त्याचा सुवर्णकळस व त्यावरील दीप आणि निशाण. खाली गोपालकृष्णासाठी निर्मिलेल्या गाभाऱ्यात समाधीरुपाने श्री साईंचा देह विराजला आहे. येथे प्रत्यही हजारो स्त्री-पुरुष, भक्त-भाविक दर्शनास येत आहेत. आपले नवस फेडीत आहेत. कारण बाबांनी त्यांच्या प्रार्थना ऐकून त्यांना कृपेने कृतार्थ केले आहे. त्यांची संतती, संपत्ति, मान, अधिकार, विवाह यांसारखी सांसारिक कामे बाबांनी पुरी केली आहेत. म्हणून ते कृतज्ञतेने नवसाची फेड करण्यासाठी समाधिमंदिरासमोर मोठी रांग लावून तासन्तास तिष्ठत उभे आहेत. **परंतु बाबांनी ही कृपा का केली आहे, ते त्यांना कळत नाही. कळले तरी वळत नाही. पुन्हा काही नवीन मागणी ते करणारच आहेत. बाबांचे भक्ताकडील मागणे सोयिस्करपणे ते विसरलेले आहेत.** बाबांना त्यांची भक्ती, त्यांची नामरूप साधना, शरणागती व निःस्वार्थ जनसेवा हवी आहे. एवढेच करावयास हे भक्त विसरले आहेत. त्यांना जाग यावयास हवी. यासाठी बाबांच्या समाधीतील त्यांच्या साधना अंतरंगाचे दर्शन घेऊ या. त्यांच्या पूर्वावताराची रामनाम साधनाही समजून घेऊ या. यामुळे आम्ही बाबांचे



मागणं पुरं करू शकू व त्यांच्या परीक्षेला उतरून खरंखुरं भक्त बनू.

ती पहा समाधी. त्या समाधीत श्री बाबांचे दिव्य शरीर विसावले आहे. ही चिरविश्रांती नाही, तर भक्तकार्यार्थ चिरजागृती आहे. येथेच ते आपल्या भक्तरूप बालगोपाळांसह बोलतात, खेळतात, त्यांच्या हृदयाला दिलासा देतात, त्यांच्या शिरावर कृपेचा हस्तस्पर्श करतात. ही समाधी जागृत आहे. हे चैतन्य मरणाने मरत नाही की जन्माने जन्मतही नाही. या समाधीतून, बाबांच्या देहाच्या कणाकणांतून रामनामाची स्पंदने ऐकू येत आहेत. अशी स्पंदने कोतेपाटील व त्यांच्या समकालीनांनी द्वारकामाईत रात्री झोपले असताना अनेकदा ऐकली होती. या रामनामाचा जप बाबांच्या कबीर अवतारापासूनचा आहे. हेच रामनाम कबीरांना रामानंद महाराजांकडून मिळाले. या निर्गुण रामनामाने कबीरांना साक्षात्कार घडविला. याच रामाची स्मृती बाबांनी सुमारे चार तपांपूर्वी शिरडी येथे रामनवमी उत्सवाला अनुमती देऊन सतत जागती ठेवली आहे. ते स्वतःच साईराम बनले आहेत. रामभक्त हनुमंताच्या दोन मूर्तींची शनिपारावर स्थापना करून त्यांनी रामभक्त शक्तिस्वरूप हनुमानाचा बहुमान राखला आहे. "हनुमंत आमुची कुळवल्ली" अशी रामदासांच्या शब्दात बाबा जणू पाथरी येथील आपल्या आरंभस्थानाची ओळख देत आहेत, असे म्हणावेसे वाटते.

मागे सांगितले आहे की, कबीर व साई एकरूप असले व त्यांचे जीवन, शिकवण सारखीच असली, तरी त्यांच्या साधनेच्या स्वरूपात थोडासा फरक आहे. तो असा की, कबीरांना, ध्रुवाला व प्रल्हादाला जे सिद्धनाम मिळाले होते, तशाप्रकारचा सुरत शब्द मिळाला व त्या नादातून त्यांना आत्मसाक्षात्कार झाला! त्यांचा राम हा निर्गुण निराकार ब्रह्म होता. तो 'रं'कारयुक्त सुरत शब्दाचा नाद कबीरांचे मन, चित्त व प्राण अहंकारासह विलीन करीत त्रिकुटशिखरावर चढला व ब्रह्मरंध्रात लीन झाला. कबीरांना सहज समाधी प्राप्त झाली. कबीरांची भक्ती केवलाद्वैती होती. त्यांनी गुरुंनी दिलेल्या सिद्ध राममंत्राची उपासना केली. आणि आत्माराम स्वयं प्रगट झाला. नाथांचे नादानुसंधान तेवढे कबीरपंथीयांनी उचलले असावे. कबीर सगुणरामाला निरंजन मानतात. त्यातून पलीकडे त्यांचा निर्गुणराम बसतो. केवलकुंभकातून कबीर प्राणांना आवरतात व अजपाजपाने रामनामाचे नाथांच्या सोऽहं सारखे श्वासात स्मरण करून अमनस्कता साधतात. शब्द हा आकाशाचा गुण आहे. नामातील नाद मनाला हळूहळू ब्रह्मांडाशी (महदाकाशाशी) एकरूप करतो. नामाच्या कंपनाने सूक्ष्मदेहातील मनोरथ देवतांकडून पुरे होतात. नाद जाणणारा विनायास मुक्ती गाठतो. विश्वाच्या आरंभीचा नाद हा नादाच्या मूळाशी असतो. हा नाद प्रथम कारणदेहात उमटतो. त्याच्या आधी तो मूलस्थानी आनंदरूप आहे. हा मूळ ओंकार रामनामात लपला आहे. या नादाचे मूळ ॐकाररूपसंगीत कबीरांनी जाणले. कुटस्थाच्यावर त्रिकुटशिखरापलीकडे गेल्यावर मेंदूतील पांढुरक्या भागातून विश्वमनाशी संपर्क घडतो. हे रामनाम घडविते. ते

सर्वविस्मृती घडविते. बुद्धीवृत्ती ब्रह्मसमरस होतात. जीवनमुक्तावस्था, स्थितप्रज्ञता हीच मुक्ती. सहजसमाधीची अवस्था ही तटस्थता नाही. ती जागृत क्रियाशील ईश्वरावस्था आहे. कल्पना शमल्या, चित्त चैतन्यरूप झाले व स्वरूपाचा नाठव झाला की उन्मनी सहजावस्था येते. यासाठी देहाचा ध्यास सोडून राममय व्हावे लागते. हेच रामनाम करते. हा रामनवमीचा खरा संदेश आहे.

**''श्वास की आस में प्राण का बास है।**
**प्राण की आस में बसत साई हैं।''** (कबीरवाणी)

त्रिकुटीवर भ्रूमध्यावर मनपवनाचा लय झाला पाहिजे. ''आपमें आप समायें'' ''शब्द निरंतर से मन लोगा'' ''वाहर भीतर एक आकाशवत्'' ''अकल निरंजन, सकलशरीरा'' या कबीरांच्या, साईरामाच्या साधनाशब्दाचे गूढ आपले आपण जाणणे सर्वात उत्तम होय!

कबीरांचे पुन: अवतरण होण्यापूर्वी अशी उन्मनी गगनोपम अवस्था, प्राणाच्या आत साईंची वसती असण्याची अवस्था त्यांना अंती लाभली होती. **हे सर्व सामर्थ्य घेऊन कबीर पुन्हा चारशे वर्षांनी अवतरले.** नव्हे तसा दृष्टांत गुरु व्यंकुशा यांना स्पष्ट झाला. मानवतजवळ कबीर पुन्हा अवतरणार होते, याची अहमदाबादेस पीर सुबागशहा यांनी व्यंकुशा यांना ग्वाही दिल्याचे गतवर्षीच्या अंकात कथन केले आहेच.

श्री साईबाबांच्या पूर्ववृत्तात ते स्वत: कबीरपंथाचे असल्याचे व व्यंकुशा हे त्यांचे गुरु असल्याचे नमूद करण्यात आले आहे, हे वाचकांना ज्ञात आहे. कबीरांनंतर ४०० वर्षांनी निधर्मी मानवतावादाचा व उद्धाराचा मार्ग सांगण्यास आलेल्या श्री साईबाबा यांनी कोणती साधना केली व आपल्या भक्तभाविकांना सांगितली, याचा आलेख आम्ही गतवर्षीच्या जुलैच्या ''गुरुपौर्णिमा'' विशेषांकात संपादकीयात रेखिला आहे. त्याचे स्मरण आम्ही वाचकांना करीत आहोत. **बाबांची साधना हा नाथ व कबीरपंथीय साधनेचा एक समन्वय मानावा लागतो.** कबीराप्रमाणे बाबा योगाच्या व निर्गुण साधनेच्या परिभाषेत कधी बोललेले नाहीत. परंतु त्यांच्या जीवनातील धौतिपौति खंडयोगाच्या आणि आणिमालघिमादी सिद्धीच्या, सृष्टीवर सत्ता गाजवणाऱ्या ईशित्व-वशित्व प्राकाम्य इत्यादी उच्च शक्तींच्या पाऊलखुणा त्यांच्या जीवनचरित्रात नमूद करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे हठक्रियादि योगज्ञान इत्यादी साधना पूर्णपणे पचवून भक्ती व सत्कर्माच्या समर्पणात्मक जीवनाचा आदर्श त्यांनी भक्तांपुढे मांडलेला दिसतो. हठयोगसाधना करणाऱ्यास त्यांनी परावृत्त केलेले दिसते. **नामस्मरण, रूपध्यान या दोन साधना त्यांनी पुरस्कारलेल्या आपण श्री साईसत्‌चरितातील घटनांत प्रतिबिंबित झालेल्या पहातो.** थोडक्यात, स्वत:च्या साधनेचा आविष्कार न करता त्या साधनेच्या सिद्धीतून भक्तांना संकटांतून सोडविणाऱ्या

व श्रद्धा, प्रेम, सबुरी बाळगणाऱ्या सच्च्या साधकावर गुरुकृपा करणाऱ्या सिद्ध अवलियाचे चित्र श्री साईबाबांच्या विभुतीमत्वात सामावलेले दिसते. यामुळे त्यांच्या साधनेवर अधिकारवाणीने लिहिण्याचे वा त्याचे सम्यक दर्शन घडविण्याचे कठीण कार्य आजवर कुणी समाधानकारकरीत्या करू शकलेला नाही. तथापि, येथे एक विनम्र प्रयत्न कृपाळू बाबांच्या अनुमतीने करण्यात येत आहे.

श्री बाबांनी चार शिष्यांची जी गोष्ट सांगितली आहे, तीवरून भक्ती व श्रद्धावान् शिष्य गुरुशरण झाल्यावर फक्त त्यालाच गुरुंनी कृपेने साक्षात्कार घडविल्याचे दिसते. गुरुंनी मनाला उलटे बांधले, त्याचे संकल्पविकल्प थांबविले व मनोलयाने आत्मदर्शन झाले, आत्मदर्शनातून त्यापलीकडील आनंदावस्था लाभली, असे वर्णन आहे. वृद्ध राधाबाईंना केलेल्या उपदेशांत बाबा आपल्या गुरुचे आपण मुखावलोकन केले. या गुरुध्यानातून आपल्याला कृपेचा लाभ झाला. फक्त दृढ श्रद्धेची व सबुरी म्हणजे तितीक्षेची दक्षिणा गुरुंना द्यावी लागली, असे बाबा सांगतात. नाथ व कबीरपंथी गुरुप्रेम व गुरुकृपा यांचा हा कबीरसाधनेचाच वारसा वाटतो. **कबीरांचा जोर नादानुसंधान या नाथांच्याकडून उचललेल्या अंशसाधनेवर होता, तर बाबांचा भर गुरुरूपाच्या नाथपंथी ध्यानावर होता.**

श्रद्धेने मन स्थिर होते. संकल्प थांबून मन निर्विकल्पाकडे झुकते. वृत्ति निरुद्ध होऊन गुरुध्यानाने गुरुमय बनतात. संसारात तितीक्षेने वा सबुरीने वागून संचित प्रारब्ध समजसपणाने संपविता येते. गुरुच्या दृष्टीतील कृपाज्योतीने शिष्याच्या हृदयातील आत्मरूपी प्रकाश जागृत होतो. ''प्रभु ज्योति मधुनी ज्योत जळो। नयनात आपुल्या नयन मिळो'' (श्री साईगीतायन) अशी अवस्था गुरुकृपेने घडते, असेच श्री बाबांना सुचवायचे आहे. कबीरांनी म्हटल्याप्रमाणे बाबांची स्थिती सहजसमाधीची होती. ''सुजनहो सहजसमाधी खरी। गुरुकृपेने जागृत झाली, अनुदिन सौख्य भरी।'' ही स्थिती स्वत:च्या सत्कर्मामुळे, सचोटीने, गुरुप्रेमाने, ईश्वरनिष्ठेने, श्रद्धेने गुरुकडून मिळविण्याची बाबांची दृष्टी दिसते. यासाठी त्यांनी योग, मंत्र-तंत्र इत्यादी कठोर साधना करणाऱ्यांना नेहमी यापासून परावृत्त केले आहे. **एका ज्ञानज्योतीने कृपेद्वारे दुसरी ज्ञानज्योत चेतवायची, हाच बाबांचा महाकृपेचा गुरुमार्ग होता.** कबीरांना मिळालेले सिद्धनाम गुरूकडून आले होते व त्याच्या शक्तिसपुटीत रकाराने त्यांना उच्चावस्था प्राप्त झाली. तसे नामस्मरण करण्यास बाबांची हरकत नव्हती. परंतु त्यांनी कुणाला सिद्धनाम दिलेले फारसे दिसत नाही. याचे कारण प्रत्यक्ष व सरळसरळ योग्य साधकावर गुरुकृपा करण्याच्या पद्धतीवर त्यांचा विश्वास होता. ''सर्व साधने तुम्ही केलीत, तरी त्यांच्या सिद्धीसाठी तुम्हाला माझ्याकडे यावे लागेल'' या बाबांच्या शब्दामागे हेच मर्म लपले होते. **कारण नामस्मरणाने चित्तशुद्धी होईल, कर्माने नैष्कर्म साधेल, ज्ञानाने समदृष्टी येईल, भक्तीने भावावस्थेपर्यंत जाल पण तुमची** प्रगती

सूक्ष्मदेहापर्यंतच पोहोचेल. सूक्ष्मातून कारणाकाकडे व कारणाकडून महाकारणाकडे (चित्ताकाशातून चिदाकाशाकडे व चिदाकाशातून महदाकाशाकडे उंचावत) नेण्यास कृपेचे स्वयंचलित उड्डाणच हवे. त्यासाठी बाबांची म्हणजे गुरुंची महाकृपा हवीच. त्याशिवाय काही होणार नाही. या साईरामाची महाकृपा होऊन मन उन्मनीत व सामरस्य अवस्थेत जाण्यासाठी दृढ श्रद्धा हवी. पण ही कृपा होण्यापूर्वी सद्‌चारित्र्य, सद्‌गुण, जनसेवा, निष्काम कर्म, भक्ती, सहना, तितीक्षा, नामस्मरण ह्या गुणांनी जडलेली सबुरीही आवश्यक आहे. ती वाचून संचित व प्रारब्ध संपणार नाही व गुरुकृपेचे महाद्वार उघडणार नाही.

**श्री रामनवमीस श्री साईरामाचा व्यवहारी आर्त, अर्थार्थी भक्तांस हा संदेश आहे. त्यांनी पुढे ज्ञानी व मुमुक्षू बनण्याचा प्रयत्न करावा व श्रद्धा-सबुरीच्या साधनेने साईरामाची कृपा संपादन करावयास प्रयत्नशील रहावे व ती कृपा मिळवावी, हे बाबांचे मागणे आहे.**

प्रगत भक्तांसाठी, जिज्ञासू व ज्ञानी साधकांसाठी बाबांचा संदेश थोडा अधिक सखोल व साधनेला आवाहन करणारा आहे. बाबांनी हठयोग किंवा मंत्रयोगाला उत्तेजन कधी दिलेले त्यांच्या चरित्रात सापडत नाही. त्यांनी गुरुच्या रुपाच्या ध्यानाचा व गुरुकृपेतून स्त्रवणाऱ्या कृपारूपी अमृताचाच वारंवार उच्चार केला आहे. उच्च ध्यान मार्गीय पाच मार्गांचा अवलंब करतात (१) पिपीलिका (२) शेष (३) विहंगम (४) मीन (५) कपी असे ते मार्ग आहेत. पिपीलिकामार्गात नाभीवर भूचरीमुद्रेने ध्यान करतात. मीनमार्गात नाकाच्या शेंड्यावर चाचरीमुद्रेने ध्यान केले जाते. शेषमार्गात धुनीसमोर सहस्त्रदलावर अगोचरमुद्रेने ध्यान होते. विहंगममार्गात भ्रूमध्यावर खेचरीमुद्रेने शांभवी दृष्टीने ध्यान करतात. कपीमार्गात अलक्षमुद्रेने ज्ञानदृष्टीने सम्यग ध्यान होते. यातील कपीमार्ग हा श्री रामाच्या सहज सोऽहं ध्यानाचा मार्ग आहे व कृपेचा त्यास वारसा आहे. श्वासाकडे अलक्षमुद्रेने ध्यान केले जाते. हा **मार्ग कबीरांनी आपल्या अवतारात आचरल्याचे आपण चिकित्सक सूक्ष्मदृष्टीने अभ्यासल्यास दिसून येईल.** त्यानंतरच्या श्री साई अवताराने ही सहजसमाधीची साधना पार केल्यावरही साधकाच्या कल्याणासाठी शेषमार्गाची धुनीसाक्ष प्रतीकात्मता आपल्या नित्य बैठकीत व जनसंपर्काच्या सत्संगातही ठेवली, असे दिसते. नारायण महाराजांनी लिहिलेल्या सीताराम महाराजचरित्रात १६व्या अध्यायात पुढील श्लोक शेषध्यानपद्धतीचे वर्णन करतो.

**सिद्धासन घालोनी। अखंड जयाची चाले धुनी।**
**पराहीच ज्याची वाणी। वैखरी ज्याने सोडिली।।**
**एकवीस हजार सहाशे जप। नाभिकमली स्थित तप।**

सहस्त्रदलावरी खेप। गोल्हाटी स्थिर केली।।

अशा महात्म्याने चित्ताकाश (मूलाधार स्वाधिष्ठान) इत्यादी वासनात्मक चक्रे केव्हाच त्यागिली आहेत. नाभिकमलावर स्थिर राहून तो सहस्त्रदल कमल पहात आहे. भ्रूमध्यावरच्या भागी अलक्षमुद्रा लावली आहे. समोर धुनीचा अग्नी पेटत आहे. भक्तांची कर्मे, पापे जाळीत आहे. हृदयात भावात्मक प्रेमपीठ शांभव आहे, तर त्रिकुटावर ज्ञानशिवाचे कैलासगोल्हाटशिखर आहे. तेथे त्याची कृपादृष्टी झेप घालीत आहे. योग्य भक्त, साधक समोर आला, तर त्याच्या हृदयातील प्रेम जागवून त्याला ज्ञानरूप कैलास पीठा (गोल्हाट)च्या महदाकाशांत (उच्च आकाशतत्त्वात) कृपेद्वारे विलीन करण्यासाठी हा महात्मा भुकेला आहे. त्याला असा भक्त, साधक हवा. केवळ व्यवहार मागणारे याचक नकोत. गेल्या एप्रिल महिन्यातील कवि-लेखक संमेलनाच्यावेळी आम्हाला आलेल्या प्रत्यक्ष अनुभवाचा लेख पुन्हा वाचावा. बाबा म्हणतात, ''माझ्या सरकारचे (श्री दत्तांचे) धन (मोक्षधन) वावरं वावरं भरून पडलं आहे. कोणी मागतच नाही.'' हे अक्षय धन आपण मागू या. अगदी या रामनवमीच्या शुभदिनी! आर्षवाणीने हा गुह्यसंदेश मांडल्यावर आता संपादक म्हणून आपला निरोप घ्यायचा आहे.

## याजसाठी होता केला अट्टाहास

माझ्या प्रिय लेखक, वाचक, कवि-मित्रांनो, गेले वर्षभर या संपादकीय स्तंभातून आपण भेटलो, बोललो, सुखसंवाद केला. हा योग आता संपला आहे. यापुढे आपली मीलनभेट 'संपादकीया'द्वारे होणे नाही. मात्र साधनेवरील लेखातून मी वावरेन. माझ्या या छोटयाशा संपादकीय कारकीर्दीत मी 'श्री साईलीला' मासिकाला वैचारिक, साधनात्मक व वाङ्मयीन दर्जा देण्याचा सायास केला. भक्ती व ज्ञानाच्या भूमिकेचा वाचकांच्या मनात उदय व्हावा म्हणून जिवापाड झटलो.

आपण माझ्यावर केलेल्या प्रेमामुळे व आपल्या सादर सहकार्यामुळे माझे मन प्रेम व कृतज्ञता या भावनेने भारावले आहे. आपल्या सद्भावाबद्दल मी आपला सदैव ऋणी राहीन. आपल्या कौतुकाच्या शब्दांचे मला विस्मरण कधीही होणार नाही. माझ्या लेखनाने आपल्या मनात आनंदाच्या उर्मी उठल्या असतील. काही वाचक-लेखकांची मने माझ्या हातून घडलेल्या अभावित त्रुटीमुळे दुखावलीही असतील. त्या सर्वांनी मला उदार मनाने क्षमा करावी.

संपादकीय कार्यालयातील माझे सहकारी, लेखाकर्मचारीवृंद त्या माझ्या साईबांधवांना माझे हार्दिक धन्यवाद. कार्यकारी अधिकारी, नवे संपादक व नवे विश्वस्त यांनाही माझ्या शुभेच्छा. आपणा सर्वांना सुख, समाधान, वैभव, आत्मिक आनंद लाभो, ही मी साईचरणी प्रार्थना करतो.

आपले मजवरचे प्रेम पूर्ववत् अखंड राहो, ही आपल्या चरणी विनम्र विज्ञापना.

- चकोर आजगांवकर
हंगामी कार्यकारी संपादक
१४ गिरीसमीप, श्रीनगर,
ठाणे-४. (फोन ५०९१८०)

# भक्तांचा भगवंत साईराम!

- श्री. मधुकर ग. अंबाडे
वडोदरा, गुजरात.

....इतक्या प्रदीर्घ कालावधी नंतरही लक्षावधी भक्तांना हा साई प्रचिती घडवितो. वेळोवेळी धाव घेतो भक्तांसाठी! दर्शन देतो भक्तांना! फुकट नाही हं! दोन नाणी द्यावी लागतात त्याला!! श्रद्धा आणि सबुरी!!!....

भक्त आणि भगवंत! एक अतूट नातं!! सर्व नाती तुटतात ह्या कालचक्राच्या गर्तीत!!! भक्त आणि भगवंताचं नातं एक अतूट नातं. देवाचा देव भक्तांसाठी अनेकदा धावलेला आहे ह्याच भूमीवर. त्यानं काय म्हणून नाही केलं भक्तांसाठी? रामरूपात ह्या भगवंतानं प्रत्यक्ष आदर्श जीवन जगून दाखविलं आपल्या भक्तांना. भक्तांची चाकरी सुद्धा केली ह्या देवानं! भक्त प्रल्हादासाठी खांबातून प्रगटला होता हा भगवंत. ह्याच साक्षात्-ईश्वर भगवंतानं रामरूपात अहिल्येला शापमुक्त केलं होतं. हाच भगवंत येशु खिस्ताच्या रूपात ह्याच भूतली येऊन आपले प्राण घेणाऱ्यांनाही आशीर्वचन देऊन गेला. ह्यानंच बुद्ध बनून जगभर श्रेष्ठ धर्म अहिंसेचा प्रचार केला. हाच कधी नानक बनला, तर कधी महम्मद पैगंबर. आम्ही खुळी नादान माणसं मात्र एकाच परमेश्वराच्या अनंत रूपांवरूनच एकमेकांत भांडत बसतो आणि तेही दरेक अवतारी पुरुषाने वा धर्मसंस्थापकाने भांडू नका सांगितलेलं असूनही. त्यावर आचार्य विनोबा भाव्यांनी फार सुंदर उद्‌गार काढलेले आहेत. ते म्हणतात, "अरे! तुमच्यापेक्षा ही कुत्री बरी! आपला मालक कसाही वेष बदलून आला, तरी ती आपल्या मालकाला बरोबर ओळखतात. परंतु तुमचा देव जेंव्हा अवतार बदलून येतो, तेंव्हा तुम्ही मात्र भांडत बसता."

ह्या भगवंतानं कुठल्या कुठल्या रूपात किती किती अवतार घेतले, याची गणना कोण बरे करू शकेल! वर्णन करण्यास मन, बुद्धी, भाषा, शब्द सगळ्या सगळ्या गोष्टी अपुऱ्या पडतात. स्वप्नवत्, खोट्या आणि नाशवंत अशा ह्या संसारातील कुठल्या वस्तुच्या सहाय्याने शाश्वत् भगवंताचे वर्णन होऊ शकेल! भक्त आणि भगवंताचं नातही तसच आहे. वर्णनातीत आहे. शब्दातीत आहे. भगवंताचे वर्णन करताना वेद, शास्त्रेही थकली आणि शेवटी म्हणू लागली नेती नेती! उरते ती फक्त अनुभूती!! प्रचिती!!!

ह्या कलियुगातही अनेक अवतार धारण केले ह्या भगवंतानं. संतस्वरूपात

आजही तो ह्या भूतली वावरतो. संतश्रेष्ठ ब्रह्मस्वरूप हा साईराम असाच अवतरला होता गोदाईच्या पावनतिरी शिरडीसारख्या छोट्याश्या खेड्यात! शिरडी गावाचे मूळ नाव शिलधी. प्राचीन भारतात तसा उल्लेखही आहे. शिरडी हा शिलधी ह्या शब्दाचा अपभ्रंश आहे. शिलधी ह्या शब्दाचा अर्थ होतो भगवान शिवाचा निवास!

आजच्या १९९० सालच्या श्री रामनवमीपूर्वी जवळ जवळ ७९ वर्षे अगोदर ह्या ईश्वरी अवतारानं, साईनं मोठ्या थाटामाटाने भव्य अशा रामनवमी उत्सवाचा ह्याच पावन शिरडीत प्रारंभ केला. ही अमोलिक परंपरा शिरडी संस्थानच्या कार्यकर्त्यांनी सुद्धा तितक्याच उत्साहाने टिकवून ठेवली. श्री बाबांच्या शिरडीत सदैव शांती आणि आनंद नांदत असतोच. तथापि, ह्याच आनंदाला उत्सव समयी वसंत ऋतुतील बहार आल्यागत वाटतं! उत्सव समयी महान शास्त्रीय संगीताच्या सप्त सुररूपी सप्त नद्यांतील जलानं सबंध शिरडीच न्हाऊन निघते. तेथे नांदत असतो केवळ आनंद, आनंद आणि आनंद! निखळ आनंद! अलौकिक आनंद!! अननुभूत आनंद!!!

इतक्या प्रदीर्घ कालावधी नंतरही लक्षावधी भक्तांना हा साई प्रचिती घडवितो. वेळोवेळी धाव घेतो भक्तांसाठी! दर्शन देतो भक्तांना! फुकट नाही हं! दोन नाणी द्यावी लागतात त्याला!! श्रद्धा आणि सबुरी!!! प्रेमळ माउलीसम बोटाला धरून सन्मार्गावर वाटचाल करण्यास शिकवितो हा साईराम! मुलाला चालता यावं म्हणून आई मधूनच बोट सोडून देते, तद्वत् भक्ताला घडविण्यासाठी त्याला दुःखं देत असतो हा भगवंत! पुन्हा कुंभाराच्या हाताप्रमाणे आतून आम्हाला आधार देत असतो हाच साई भगवंत. भक्ताचं आणि भगवंताचं नातं जोडलं जातं श्रद्धा भक्तीच्या धाग्यानं! ते कधीच नष्ट होत नसतं, चिरकाल टिकणारं असतं; कारण त्यात भाव, प्रेम, श्रद्धा नावाचं अमृत असतं! नातं जोडायचाच अवकाश, मग भगवंताची अनुभूती भक्तास येतेच. मग भक्त बनतो निश्चिन्त, होतो तो मुक्त! मुक्त ह्या शब्दाचा तसा व्यापक अर्थ आहे. लोभमुक्त, भयमुक्त वगैरे. सर्वच प्राणीमात्रांवर सारखेच प्रेम करणाऱ्या भगवंताला भक्त अधिक प्रिय असतो. भक्त भगवंताचं नातं असंकाही विलक्षण आहे की, कधी कधी ज्ञानीमुनीपेक्षाही भक्त पुढे निघून जातो तो केवळ भगवंताच्या अमोघ कृपेनं! प्रमाणभूत ग्रंथशास्त्रात भक्तासाठी भगवंत धावलेल्याची अनेक उदाहरणं आहेत. एक नियम आहे, शक्तीच्या सहाय्यानं शक्ती प्राप्त करता येते. ह्या नियमानुसार भक्ताच्या भावशक्तीनं भगवंताची कृपाशक्ती प्राप्त करता येते; हवा तो केवळ भाव!

प्रभू श्री रामचंद्रानं सर्वास्वाचा त्याग करून वनवास पत्करला. आपल्या पदरी हसत हसत दुःख स्वीकारलं! आणि त्यामुळेच तो अनेक कार्य करू शकला, हे त्यानं स्पष्ट बोलूनही दाखविलं. जणू दुःखाचे महत्त्व पटवून देण्यासाठीच त्याची ही लीला होती. आजच्या **श्री रामनवमी** निमित्त हसत हसत दुःखाला सामोरे जाण्याची शक्ती आपणास लाभो, अशी आपल्या साईरामाला प्रार्थना करू या! ज्यात भौतिक

गोष्टींची कुठलीच मागणी नाही, ती प्रार्थना; अन्यथा ती याचनाच म्हटली जाते. तथापि, सर्वच प्राण्यांवर सारखेच प्रेम करणारा भगवंत भक्तावर भक्त ह्या नात्यानं कृपा करीत असतो; म्हणून भक्तास भगवंत दुःख देत असतो. ही चटकन् न समजण्यासारखी गोष्ट आहे; पण ही वस्तुःस्थिती आहे. यासाठी आवश्यक आहे ते चिन्तन!

भक्तांच्या दुःखाची महत्ता यथार्थरीतीने समजण्यासाठी ही पुढील दृष्टांत कथा मोठी रोचक आणि मार्गदर्शक आहे. –स्वर्गात एक ब्राह्मण होता. त्याला जगातील दुष्कृत्ये करणाऱ्यांनाही सुखी पाहून मोठे आश्चर्य वाटे. त्यानं एक दिवस श्री विष्णूंना विचारलं, ''हे परमेश्वरा! आपण म्हणता माझी सर्वांवर सारखीच कृपा आहे. हे खरं आहे का? श्री विष्णूंनी निक्षून होकार दिला. त्याचप्रमाणे सदर सत्य पटवून देण्यासाठी श्री विष्णूंनी दुसऱ्या दिवशी त्या ब्राह्मणाला आपल्याबरोबर भूलोकी येण्यास सांगितलं. श्री विष्णूंनीही एका ब्राह्मणाचे रूप धारण केले. ठरल्याप्रमाणे ब्राह्मण वेषधारी श्री विष्णू आणि तो ब्राह्मण एका भाविक स्त्रीच्या घरी भिक्षा मागण्यास आले. त्या स्त्रीने मोठ्या भक्तिभावानं भोजन करविलं. आता जाताना त्या स्त्रीला श्री विष्णूने आशीर्वाद दिला. ते शब्द फक्त ब्राह्मणच ऐकू शकेल, अशातऱ्हेने हळूच बोलले, ''तुझी गाय मरून जावो.'' वास्तविक त्या एकच गाईवर तिचा निर्वाह चालत होता. ती गाय खरोखर मेली. ब्राह्मणाला मोठे आश्चर्य वाटले. तद्नंतर श्री विष्णू आणि तो ब्राह्मण एका महालाद्वारी आले. तेथील मालकानं त्यांना अपमानित करून हाकलवून दिलं. तेंव्हा श्री विष्णूंनी आशीर्वचन काढले, ''तुझा याहीपेक्षा एक सुंदर महाल तयार होवो.'' खरोखर, काही दिवसांनी एक सुंदर महाल तयार झाला. त्या ब्राह्मणाच्या आश्चर्याला आता सीमा उरली नाही. श्री विष्णू आता खुलासा करताना म्हणाले, ''त्या स्त्रीच्या गायीचा तोच मृत्यूचा क्षण होता. त्या स्त्रीचा भाव पाहून तिला भोगमुक्त करण्याचं माझं कर्तव्यच ठरतं. माया-बंधनात गुरफटलेला तो महाल-मालक बघ! त्यानं आपल्याच अहंकाराच्या चिवट तंतूने ते वैभवाचे बंधन अधिक घट्ट करून घेतलं.''

**अभंग**—सुख येता वाढे भोग।  
दुःख येता वाढे योग॥  
सुखासंगे ये आसक्ती।  
दुःख अर्पी भक्ता मुक्ती॥

---



# साईबाबा भक्तांना सांगतात.....

- सौ. कुसुम रमेश चव्हाण
पत्रकार
नवापूर, धुळे.

...मला स्वत:पेक्षा तुमची फार काळजी वाटत आहे. या जन्मात काहीतरी सत्कृत्य करा. माझ्यापासून थोडेतरी आध्यात्मिक ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करा. अल्ला तुमचे भले करील आणि तुम्हाला सुख देईल....

● "लोक कसे मतलबी असतात बघा. वेळ आली म्हणजे आपल्या साथीदाराला सोडून स्वार्थ बघतात; म्हणून नेहमी आपल्याला कधीही सोडणार नाही असाच मित्र किंवा साथीदार पहावा. सर्व भूमात्रांवर प्रेम करावे; पण संग मात्र सद्गुरूचाच करावा. तो आपल्या भक्तांना कधीही अंतर देत नाही."

● "माझ्या प्रेमळ भक्तांनों, तुम्ही कुठेही असा, काहीही करा; पण एक गोष्ट मात्र सदैव लक्षात ठेवा की, तुमच्या बऱ्यावाईट सर्व गोष्टी मला सत्वर कळतात. मी सर्वांच्या अंतर्यामी शिरून जगातील सर्व चल आणि अचल वस्तूंना परमेश्वराच्या हुकूमाने सूत्रधार म्हणून गति देतो. विश्वाच्या रंगभूमीवरील पडदे ओढणारा मी निमित्त मात्र गडी आहे; पण माझ्या हाती हे मायापटल दूर करण्याची असामान्य शक्ती असल्यामुळे कुणालाही आपले काम योग्यरीतीने करण्यास मी योग्य तेच मार्गदर्शन करीन. प्रत्येक व्यक्तीचा उद्धार करणे, हेच आमचे या जन्मातील काम आहे. साधक स्थितीत संसारातील मोहपाशांत घुटमळत पडलेल्या अभागी जीवांना हळूहळू पायरी-पायरीने शुद्ध स्वरूपाचे करीत पूर्ण परब्रह्मस्थितीला पोहोचविणे, हेच आमचे अंतिम ध्येय आहे. आमच्या गुरूपरंपरेला अनुसरून आमचा मार्ग इतर संतांपासून थोडा निराळा आहे इतकेच."

● "संसारात प्रत्येकाला सुख-दु:खे ही भोगावी लागणारच; पण माझ्या एकनिष्ठ भक्ताला कुटुंबपोषणाला लागणाऱ्या आवश्यक गोष्टींची, म्हणजे अन्नपाणी आणि कपडालत्ता यांची ददात मी कधीही पडू देणार नाही. माझ्यासारख्या कफल्लक फकिराकडून भक्तांनी जास्त अपेक्षा करू नये. क्षणभंगुर संपत्तीची आणि मानमान्यतेची खोटी आशा मनात बाळगू नका. माझ्या शक्तीच्या बाहेरच्या गोष्टी मागण्याकरिता माझे पाय धरू नका. त्याऐवजी आपल्या सच्चिदानंद दयाघन प्रभूची मनोभावे आराधना कराल, तर तोच हाकेला धावून येईल. आम्ही निमित्तमात्र परमेश्वराचे बंदे गुलाम

आहेत. कोणत्याही धर्मातील परमेश्वराचे ध्यान एकदा निश्चित करा. एकतानतेने आणि परमभक्तीने आपल्या इष्ट देवतेची आराधना करा, म्हणजे माझ्या ठिकाणी तुम्हाला दुजाभाव आढळणार नाही. ही मनाची एकाग्रता आणि समाधीची पूर्वस्थिती प्राप्त करून घेण्याकरिता आपले मन नेहमी चांगल्या गोष्टींकडे वळविले पाहिजे. दुष्ट, वाईटसाईट विचार काढून टाका आणि नित्य सदाचाराने वागणाऱ्या मित्रांची संगत ठेवा."

● "कधीही न मिळणारा असा हा मनुष्यजन्म विषयोपभोगांच्या नादी लागून फुकट घालवू नका. तुम्हाला जे समजणार नाही, ते मला विचारा. तुमच्या सेवेसाठी, तुमचा आध्यात्मिक दर्जा वाढविण्यासाठीच मला परमेश्वराने येथे पाठविले आहे. तुमच्यासाठी माझा जीव तळमळत आहे. तुमचा उद्धार करणे, हे या अल्लाच्या सेवकाचे कर्तव्य आहे. तुम्हाला भक्तिमार्गाचा उपदेश करीत असताना माझ्या हातून लोकसेवेचे अमोल कार्य घडून येत आहे. या जगात अमर कोणीही नाही. प्रत्येकाला एक दिवस मरावयाचे आहे. हे मरणाचे भूत नित्य डोळ्यांसमोर ठेवा, म्हणजे त्या भीतीने तरी तुम्हाला परमेश्वराची आठवण होईल आणि आपण या जन्मात काहीतरी सत्कर्म केले पाहिजे, याची जाणीव होईल."

● "आपल्या मनातील अहंकार सोडून द्या. आपल्याला आवडेल त्या देवदेवतेची आराधना करा आणि माझ्यावर अढळ विश्वास ठेवा. इतकी साधी आणि सोपी गोष्ट प्रत्यक्ष कृतीत आणलीत की, तुमचे काम फत्ते झाले म्हणून समजा. प्रत्येकाला सुख-दुःख हे भोगलेच पाहिजे; पण दुःखाची तीव्रता कमी करण्यासाठी प्रत्येकाने आपल्या नित्य व्यावहारिक दैनंदिन कार्यक्रमात अगदी अल्प वेळ का होईना, पण ईश्वराचे नामस्मरण केलेच पाहिजे."

● "हा नश्वर देह सोडून मी आता जातो आहे; परंतु तुम्ही दुःखी होऊ नका. माझ्या समाधीतील हाडे तुम्हाला स्फूर्ति आणि पूर्ण विश्वास देतील. मला शरण आलेल्या भक्तांबरोबर मी समाधीतून संभाषण करीन आणि विचारविनिमय करून त्यांना योग्य ते मार्गदर्शन करीन. मी सतत तुमच्या जवळ आहे, ही भावना मनात खोल रुतवून वागा; म्हणजे तुम्हाला कोणत्याही अंगिकृत कार्यात अपयश येणार नाही."

● "माझ्यावर जो निरपेक्षभावाने आणि हृदयाच्या तळमळीने प्रेम करील, त्यालाच माझ्या सत्य स्वरूपाची ओळख पटेल. माझ्याशिवाय सर्व जग त्याला शून्य दिसेल. माझ्याठिकाणी आपल्या सर्व मनोविकारांचा होम करणाऱ्या व्यक्तीला मी या जन्मातच नाही, तर जन्मोजन्मी कधीही अंतर देणार नाही. मी माझी स्वतःची शक्ती दयाघन परमेश्वराकडे खर्च करून, माझ्या भक्तांच्या उपकारांची शक्य ती फेड करीन."

● "हा नश्वर देह मातीत मिळून जाईल. पंचप्राण वायूत मिसळून जातील;

पण गेलेली वेळ पुन: येणार नाही. मी आज येथे आहे, उद्या दुसरीकडे निघून जाईन. मायेच्या शृंखला मलाही बंधनकारक आहेत. मला स्वत:पेक्षा तुमची फार काळजी वाटत आहे. या जन्मात काहीतरी सत्कृत्य करा. माझ्यापासून थोडेतरी आध्यात्मिक ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करा. अल्ला तुमचे भले करील आणि तुम्हाला सुख देईल.''

● ''वाटाड्याशिवाय तुम्हाला मार्ग मिळणार नाही. शिवाय भुकेल्यापोटी कोणतेही कार्य सिद्धीस जाणार नाही. ईश्वरी नेमानेमानेच आपल्या भेटी होतात. पुढे आलेल्या अन्नाला कधीही दूर सारू नये. अन्नाने भरलेले ताट पुढे येणे, हा फार मोठा शुभयोग आहे.''

● ''मागील जन्मांच्या कृतीप्रमाणे या जन्मात चांगले-वाईट प्रसंग भोगणे भाग आहे. आत्महत्येसारखे भयंकर कर्म करून तरणोपाय होत नाही, उलट पुढील जन्मांत यापेक्षा जास्त त्रास सहन करावा लागेल. तेव्हा आपल्या कर्माने प्राप्त झालेले दु:ख या जन्मातच भोगणे, हे जास्त समंजस आणि शहाणपणाचे होईल. निदान पुढील जन्मांत तरी सुख भोगण्यास मिळेल.''

● ''कोठेही कोणाच्याही दर्शनाला जा. श्रद्धा मात्र तुमच्या गुरुच्या ठिकाणी ठेवा. एकाच व्यक्तीच्या पायांजवळ मन स्थिर करा आणि मनात त्याच विभूतीबद्दल पूर्ण भक्ती ठेवत जा. गुरुची आज्ञा प्रमाण मानून जो भक्त श्रद्धेने क्षणाचाही विलंब न करता प्रत्यक्ष कृतीत आणतो, तोच भक्त प्रथम श्रेणीचा समजला जातो.''

● ''कुणीही व्यक्ती पूर्वजन्मातील कार्यकारणसंबंध असल्याशिवाय एकमेकांजवळ आकर्षित होत नाहीत; म्हणून तुमच्याजवळ एखादी व्यक्ती अगर प्राणी जर योगायोगाने आला, तर त्याला दुष्ट बुद्धीने झिडकारून दूर लोटू नका; अत्यंत प्रेमाने त्याला जवळ घ्या आणि योग्यतऱ्हेने वागवा. तृषिताला पाणी पाजा, भुकेल्या अतिथाला अन्नाचा घास द्या, गरीब दीन-दुबळ्याला लज्जारक्षणार्थ तुमच्याजवळील वस्त्र अर्पण करा आणि तुमचे घर कुणाही आश्रिताला विसाव्याचे ठिकाण असू द्या. इतक्या भूतदयेच्या सोप्या गोष्टी तुमच्या नित्य आचरणात भिनल्या, म्हणजे प्रत्यक्ष श्रीहरीला तुमच्या हाकेला धावत येणे भाग पडेल. दानधर्म करताना तुमची इच्छा नसली अगर ऐपत नसली, तर खुशाल गप्प बसा; काहीही देऊ नका; पण भिक्षा मागण्याकरिता आलेल्या कोणाही व्यक्तीला निष्ठूरपणे झिडकारू नका. त्याच्या दीन हृदयावर कोणताही आघात करू नका.''

● ''तुमच्या विरुद्ध कोणीही निंदानालस्ती केली, तर उलट शिव्यांची लाखोली वाहून आपली अवनति करून घेऊ नका. फक्त मन शांत ठेवा आणि त्याच्याकडे दुर्लक्ष करा. निरनिराळ्या नास्तिक विचारसरणीचा तुमच्याभोवती झंझावात सुरु असताना आपली मन:स्थिती अचल, स्थिर ठेवून परमेश्वरभक्तीकडे एकाग्रता ठेवा.